महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

जावक क्रमांक - ४४७ दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# ना. म. जोशी मार्ग-परळ बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला येत्या १५ दिवसात प्रारंभ करा - श्री. आदित्य ठाकरे

मुंबई, दि. ०२ फेब्रुवारी, २०२२ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक असलेल्या मुंबई मंडळाने ना. म. जोशी मार्ग-परळ येथील बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला येत्या १५ दिवसात प्रारंभ करण्याच्या सूचना राज्याचे पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी आज दिल्या.

ना. म. जोशी मार्ग-परळ येथील बीडीडी चाळींतील रहिवाशांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळावी या उद्देशाने वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवन या म्हाडा मुख्यालयात श्री आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने आज बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, आमदार श्री. सुनील शिंदे, बेस्ट समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक श्री. आशिष चेंबूरकर, ना. म. जोशी मार्ग विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. परमजित दहिया , ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेश केवाळे आदींसह ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळ प्रकल्पातील रहिवासी देखील उपस्थित होते.

सदर बैठकीत श्री. ठाकरे यांनी पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांची बाजू ऐकून घेतली. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, ना. म. जोशी मार्ग पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांची पात्रता निश्चिती सर्वात आधी करण्यात आली. येथील २७२ पात्र रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ येथे उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमध्ये म्हाडा संक्रमण गाळ्यात स्थलांतरीत झालेल्या २७२ पात्र भाडेकरूंना वितरित करावयाच्या पुनर्वसन सदनिकांची संगणकीय प्रणालीद्वारे निश्चितीही करण्यात आली आहे. मात्र, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पाडण्यात येणाऱ्या इमारती १०० टक्के रिकाम्या झालेल्या नाहीत. जे रहिवासी स्थलांतरास विरोध करीत आहेत त्यांनी या कामी शासनास व म्हाडास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन श्री. ठाकरे यांनी केले.

ना. म. जोशी मार्ग-परळ बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरु न झाल्यामुळे म्हाडाच्या मुंबई मंडळाला दिवसाला लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच येत्या १५ दिवसांत रहिवाशांना स्थलांतरित करून इमारतींच्या पाडकामाला सुरवात करण्याच्या सूचना मुंबई मंडळाच्या अधिकाऱ्यांना आजच्या बैठकी दरम्यान दिल्या.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण


TAINA
TAINA

